ePaper
| वर्ष - 6 । अंक - 181 | UDYAM-MH-26-0158827 |
महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | गुरुवार । दिनांक13 ऑक्टोबर2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# सरकारचा मोठा निर्णय; 20 सनदी अधिकाऱ्यांच्या तडकाफडकी बदल्या



**आतील पानांत**
- हळदीच्या दरात ५०० रुपयांपेक्षा अधिक घट
- अमर मूलचंदानींसह संचालकांना 'मोक्का' लावा !
- मुख्यमंत्र्यांचा कारभार फक्त एक वर्षाचा

## 'मशाल' पेटली ; पण...

# 'ढाल-तलवारी'चा खणखणाट दिसेना!

## पिंपरी-चिंचवडमधील शिंदे गटात शांतता : ठाकरे गटाकडून जल्लोष अन् शक्तीप्रदर्शन






**। पिंपरी-चिंचवड ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

शिवसेनेची दोन शकले निर्माण झाल्यानंतर पिंपरी-चिंचवडमध्ये ठाकरे गटाच्या समर्थकांनी 'मशाल पेटवली', जल्लोष केला. मात्र, शिंदे गटात कमालीची शांतता दिसत आहे. खासदार श्रीरंग बारणे स्वत: शिंदे गटाचे समर्थक असताना शहरात मात्र, 'ढाल- तलवारी'चा खणखणाट दिसला नाही. राज्यातील सत्ता पटलावर प्रचंड उलथापालथ सुरू आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी स्थापन केलेल्या 'शिवसेना' पक्षात दोन गट निर्माण झाले असून, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे विरुद्ध माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे असा संघर्ष पेटला आहे. निवडणूक आयोगाने शिंदे गटाला 'बाळासाहेबांची शिवसेना' असे नाव आणि 'ढाल- तलवार' हे चिन्ह दिले. दुसरीकडे, ठाकरे गटाला 'शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे' असे नाव आणि 'मशाल' हे चिन्ह मिळाले. संपूर्ण ठाकरे विरुद्ध शिंदे या संघर्षाचे पडसाद उमटले आहेत. दरम्यान, ठाकरे गटाच्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून पिंपरी-चिंचवडमध्ये मशाल पेटवण्यात आली. त्याद्वारे अगदी वाजत-गाजत नव्या चिन्हाचे स्वागत केले. तसेच, गद्दारांच्या ४० तोंडाच्या रावणाला आमची मशाल जाळून टाकणार...असा गर्जनाही पहायला मिळाली.

दुसऱ्या बाजुला, मावळ लोकसभा मतदार संघाचे खासदार श्रीरंग बारणे यांनी शिंदे गटाला अर्थात 'बाळासाहेबांच्या शिवसेने'ला समर्थन दिले आहे. तसेच, पिंपरी विधानसभेचे माजी आमदार गौतम चाबुकस्वारही त्यांच्यासोबत आहेत. विद्यमान खासदार आणि टीम सोबत असतानाही निवडणूक आयोगाच्या निर्णयानंतर उत्साह

### राहुल कलाटे गटामध्येही शांतता...

शिवसेनेचे माजी शहराध्यक्ष व गटनेते राहुल कलाटे यांच्या गटातही कमालीची शांतता दिसत आहे. शहरातील राजकीय परिस्थिती आणि अस्थिरता पाहता कोणत्याही गटाचा शिक्का लावून घ्यायचा नाही, असा काहीसा पवित्रा कलाटे यांचा दिसतो आहे. वास्तविक, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे दोघांच्यासोबतही कलाटे यांचे निकटते संबंध आहेत. २०१९ मध्ये कलाटे यांनी चिंचवड विधानसभा अपक्ष लढवली होती.

### संघटनात्मक बांधणीकडे बारणेंचे लक्ष...

शिंदे गटाचे अर्थात 'बाळासाहेबांच्या शिवसेने'चे खासदार श्रीरंग बारणे यांनी संघटनात्मक बांधणीकडे लक्ष केंद्रीत केले आहे. सध्यस्थितीला युवा सेनेच्या काही पदाधिकाऱ्यांनी राजीनामे दिले आहेत. बारणे यांचे सुपूत्र विश्वजीत बारणे यांच्याकडे युवासेनेचे शहर अधिकारी पद होते. त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे, असे सांगण्यात येते. शिंदे गटाकडून स्वतंत्र कार्यकारिणी जाहीर करण्याच्या हालचाली सुरू असून, संघटनात्मक बांधणीसाठी खासदार बारणे स्वत: लक्ष घालत आहेत. पिंपरी-चिंचवडमध्येसुद्धा ठाकरे गट विरुद्ध शिंदे गट असा सामना पहायला मिळणार आहे.

# शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील!

## शेखर सिंह यांचे मत : महापालिका वर्धापन दिनानिमित्त कार्यक्रम

**। पिंपरी ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पिंपरी-चिंचवड शहराचा वेगळा ठसा उमटवण्यात सर्वांचा महत्वाचा वाटा असून शहराच्या वाढत्या विकासाचा आलेख पाहता सेवेची गुणवत्ता कायम राखून शहराचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी महापालिका नेहमीच प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले. अधिकारी, कर्मचाऱ्यांनी सेवा बजावत असताना स्वतःच्या आरोग्याकडे प्राधान्याने लक्ष देत तणावमुक्त जीवन जगावे, असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

पिंपरी चिंचवड महानगरलिकेच्या ४० व्या वर्धापनदिनानिमित चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहामध्ये महापालिका अधिकारी कर्मचा-यांसाठी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, जितेंद्र वाघ, उल्हास जगताप, सहआयुक्त आशादेवी दुरगुडे, मुख्य अग्निशमन अधिकारी किरण गावडे, मुख्य सुरक्षा अधिकारी मेजर उदय जरांडे आदी उपस्थित होते.



आयुक्त शेखर सिंह म्हणाले, पिंपरी चिंचवड शहराचा वारसा आणि इतिहास मोठा आहे.तसेच भारतातील वेगवान औद्योगिकीकरण आणि शहरीकरण होणा-या शहरांपैकी पिंपरी चिंचवड शहर हे एक आहे. शहराचा सर्वांगीण विकास साधताना आपल्यापुढे हवामान बदलाचे सर्वात मोठे आव्हान असणार आहे. त्यामुळे पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी शाश्वत विकास या संकल्पनेला मूर्त रूप देणे काळाची गरज आहे. अधिक रुंद रस्त्यांचे शहर अशी आपल्या शहराची ओळख आहे. ती कायम राखण्यासाठी नागरिकांना पायाभूत सुविधा उपलब्ध करून देताना भविष्यातील निर्माण होणाऱ्या समस्यांचा विचार करून विकास आराखडा तयार करून त्याची जास्तीत जास्त प्रमाणात अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात येत आहे.

### चला निरोगी जगूया...

अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी "चला निरोगी जगूया " या विषयावर आधारित आरोग्य विषयक मार्गदर्शन आयोजित केले होते. आयुर्वेद तज्ञ डॉ. शिवरत्न शेटे यांनी यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यानंतर महापालिकेतील अधिकारी, कर्मचारी यांच्या वतीने गीत गायन तसेच नृत्य सादर करत वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

# हळदीच्या दरात 500 रुपयांपेक्षा अधिक घट

## देशात 45 लाख पोती शिल्लक; पूरक उद्योगातील मंदीचा परिणाम

।पुणे। महाईन्यूज।

**हळदीच्या उत्पादनात मोठी वाढ, भुकटीचा वापर होणाऱ्या पूरक उद्योगातील मंदी आणि उत्पादनाच्या तुलनेत निर्यातीत वाढ न होणे आदी कारणांमुळे या उत्पादनाच्या दरात प्रति क्विंटलला ५०० ते १००० रुपयांनी दरात घट झाली. तर, सध्या देशात हळदीची ४५ लाख पोती (एक पोते ५० किलो) शिल्लक आहेत. भविष्यातही दरात फारशी तेजी येण्याची शक्यता नाही, असा अंदाज जाणकारांचा आहे.**



यंदा मराठवाड्यातील विक्रमी लागवडीसह देशात हळदीची सुमारे २ लाख ४४ हेक्टरवर लागवड झाली होती; पण पाऊस जास्त झाल्यामुळे उत्पादनात घट होऊन सरासरी ८० लाख पोती उत्पादन झाले होते. दोन वर्षांपासून देशात या उत्पादनात वाढ होत आहे. शिवाय दरवर्षी देशभरात सुमारे २५ लाख पोती शिल्लक असतात. त्यामुळे बाजारात १ कोटी १० लाख पोती विक्रीसाठी उपलब्ध असतात. यंदा देशांतर्गत पूरक उद्योगात मंदीचे वातावरण आहे. त्यामुळे हळदीचा वापर कमी झाला आहे. सध्या देशात या उत्पादनाची ४५ लाख पोती शिल्लक आहेत. यंदाच्या हंगामाच्या सुरुवातीला दरात ५०० ते ८०० रुपयांनी तेजी होती. जून महिन्यात देखील दर टिकून होते; पण आता काही प्रमाणात मंदी आहे. देशात दररोज चार ते पाच लाख पोती विक्री होत असली, तरी बाजारात फारसा उठाव नाही.

> जिहळदीचा वापर होणाऱ्या पूरक उद्योगात मंदीचे वातावरण आल्याने तिच्या खरेदी-विक्रीवर परिणाम झाला आहे. तसेच देशात या पिकाच्या क्षेत्रात वाढ होत आहे. याचा परिणाम दरावर होत आहे. गेल्या वर्षीपेक्षा यंदा निर्यातीत वाढ झाली असल्याने काहीसा दिलासा मिळाला आहे.
>
> **– मनोहर सारडा, हळदीचे व्यापारी, सांगली**

### दिवाळीनंतर विक्रीस गती?

दिवाळीनंतर हळदीच्या विक्रीत वाढ होईल, असा अंदाज व्यापाऱ्यांनी व्यक्त केला आहे. ऑक्टोबर ते जानेवारी या चार महिन्यांत २० ते २५ लाख पोत्यांची विक्री होण्याची शक्यता आहे. तरीही यंदाच्या हंगामात सुमारे २० ते २५ लाख पोती हळद शिल्लक राहतील. या दरम्यान हळदीच्या दरात तेजी-मंदी होण्याची शक्यताही नाही. दर स्थिर राहतील, असे व्यापाऱ्यांनी सांगितले.

### उत्पादनाचा अंदाज का चुकतो?

देशात हळदीची लागवड २ लाख ७५ हजार हेक्टरवर झाली होती. गेल्या काही वर्षांत हवामानात वेगाने बदल होत आहे. अति पाऊस, दुष्काळ आणि उष्णतेच्या लाटांचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे कोणत्या भागात हळदीच्या पिकाचे नुकसान झाले, कोणत्या भागात पीक चांगले आहे, याचा अंदाज लावणे कठीण झाले आहे. डिसेंबर-जानेवारीच्या दरम्यान देशातील या पिकाचे क्षेत्र आणि पिकाची परिस्थिती समोर येईल. त्या वेळी उत्पादन घटेल की वाढेल, याचा अंदाज लावणे शक्य आहे.

---

# डिझेल अभावी एसटी बस फेऱ्या रद्द!

## स्वारगेट स्थानकात गोंधळ, प्रवाशांना मनःस्ताप

।पुणे। महाईन्यूज ।

डिझेलच उपलब्ध नसल्याने स्वारगेट एसटी स्थानकातून सुटणाऱ्या विविध गाड्या रद्द कराव्या लागल्या

डिझेलच उपलब्ध नसल्याने स्वारगेट एसटी स्थानकातून सुटणाऱ्या विविध गाड्या रद्द कराव्या लागल्याने बुधवारी चांगलाच गोंधळ उडाला. प्रवाशांना या प्रकारामुळे मनःस्ताप सहन करावा लागला. एसटी गाड्यांसाठी डिझेल उपलब्ध करून देणाऱ्या पंपचालकाची थकबाकी न भरल्याच्या कारणावरून ही स्थिती निर्माण झाली होती. एसटीच्या गाड्यांसाठी खासगी पेट्रोल पंपचालकांच्या माध्यमातून डिझेल उपलब्ध करून दिले जाते. मासिक पद्धतीने डिझेलची रक्कम एसटी महामंडळाकडून जमा केली जाते. बुधवारी नेहमीप्रमाणे विविध मार्गांवर निघण्यापूर्वी एसटी चालकांनी स्थानकाच्या जवळ असलेल्या आणि एसटीचा करार असलेल्या पेट्रोल पंपावर डिझेल भरण्यासाठी गाड्या नेल्या असता डिझेल उपलब्ध नसल्याचे त्यांना सांगण्यात आले. त्यामुळे गोंधळाची स्थिती निर्माण झाली.




**एसटी गाड्यांसाठी डिझेल उपलब्ध करून देणाऱ्या पंपचालकाची थकबाकी न भरल्याच्या कारणावरून ही स्थिती निर्माण झाली होती. एसटीच्या गाड्यांसाठी खासगी पेट्रोल पंपचालकांच्या माध्यमातून डिझेल उपलब्ध करून दिले जाते. मासिक पद्धतीने डिझेलची रक्कम एसटी महामंडळाकडून जमा केली जाते. बुधवारी नेहमीप्रमाणे विविध मार्गांवर निघण्यापूर्वी एसटी चालकांनी स्थानकाच्या जवळ असलेल्या आणि एसटीचा करार असलेल्या पेट्रोल पंपावर डिझेल भरण्यासाठी गाड्या नेल्या असता डिझेल उपलब्ध नसल्याचे त्यांना सांगण्यात आले. त्यामुळे गोंधळाची स्थिती निर्माण झाली.**

गाड्यांच्या वेळेमध्ये प्रवासी स्थानकावर दाखल झाले होते. मात्र, डिझेलच नसल्याने चालकांनी गाड्या पुन्हा आगारात लावल्या. प्रवासासाठी वेळेत गाड्याच उपलब्ध होत नसल्याने प्रवाशांना मनःस्ताप सहन करावा लागला. प्रवाशांनी याबाबत स्थानकात विचारणा केली, मात्र त्यांना योग्य उत्तर मिळाले नाही. पेट्रोल पंप चालकाची डिझेलची थकबाकी न भरल्यामुळे डिझेलसाठी नकार देण्यात आल्याचे सांगण्यात आले. या प्रकारामुळे दिवसभर स्थानकातील गाड्यांचे वेळापत्रक विस्कळीत झाले होते.

# आता शाळेतही 'अखंड भारत' त्रिमितीय नकाशाचे अनावरण !

## राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते उद्घाट

।पुणे। महाईन्यूज ।

शिक्षण प्रसारक मंडळीच्या एसपीएम इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये अखंड भारताचे १५ फूट लांब, दहा फूट रुंदीचे नकाशारूपी मानचित्र साकारण्यात आले आहे.

शिक्षण प्रसारक मंडळीच्या एसपीएम इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये अखंड भारताचे १५ फूट लांब, दहा फूट रुंदीचे नकाशारूपी मानचित्र साकारण्यात आले आहे. हा त्रिमितिय स्वरुपातील असल्यामुळे विद्यार्थ्यांना भारताच्या प्राचीन रुपासह इतिहासात झालेल्या वेगवेगळ्या विभाजनांपूर्वी प्राचीन भारतातील प्रदेश, त्यांची पूर्वीची नावे विद्यार्थी पाहू शकतात. राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांच्या हस्ते या नकाशाचे उद्‌घाटन झाले. संस्थेचे अध्यक्ष ॲड. एस.के. जैन, उपाध्यक्ष श्रीकृष्ण चितळे, शाळा समितीचे अध्यक्ष ॲड. मिहीर प्रभुदेसाई, राजेंद्र पटवर्धन, सुधीर काळकर, नियामक मंडळ सदस्य पराग ठाकूर, अशोक वझे, संस्थेच्या सचिव डॉ. राधिका इनामदार, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका रमा कुलकर्णी आदी या वेळी उपस्थित होते. ॲड. मिहीर प्रभुदेसाई यांच्या संकल्पनेला मूर्त रुप देण्यासाठी शिवसेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष धनंजय चंद्रात्रे, बकेट डीझाईन या डिझाईन स्टुडिओ हृषिकेश राऊत आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी चार महिने संशोधन करून तीन महिन्यात नकाशाची निर्मिती करण्यात आली.



# अमर मूलचंदानीसह संचालकांना 'मोक्का' लावा!

## डब्बू आसवानी यांची मागणी : कर्ज वितरणाची वसुलीसुद्धा करा

**पिंपरी-चिंचवड ।। महाईन्यूज । प्रतिनिधी।**



**सेवा विकास बँकेचे माजी अध्यक्ष अ‍ॅड. अमर मूलचंदाणी आणि त्यांचे सहकारी संचालक यांनी दि. सेवा विकास सहकारी बँकेत संगणमताने बेकायदेशीररित्या, आर्थिक गैरव्यवहार करून बँकेला आर्थिक संकटात टाकले आहे. परिणामी बँकेवर आरबीआयने कारवाई केली आणि बँकेचा परवाना दोन दिवसांपूर्वी रद्द केला.**

या सर्व घटनेला माजी अध्यक्ष अ‍ॅड. अमर मुलचंदाणी आणि त्यांचे सहकारी संचालक हे जबाबदार असून त्यांच्यावर सरकारने मोक्कांतर्गत कारवाई करावी. तसेच सह निबंधक (लेखा परीक्षण) मा. राजेश जाधवर यांच्या चाचणी लेखापरीक्षण अहवालातील 429 कोटी रुपयांच्या कर्ज वितरणाची वसुली मूलचंदाणी आणि व त्यांच्या सहकारी संचालक मंडळांकडून वसूल करावी अशी मागणी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माजी उपमहापौर डब्बू आसवानी यांनी केली आहे.

पिंपरी येथे बुधवारी (दि.१२) आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत डब्बू आसवानी बोलत होते. यावेळी उद्योजक श्रीचंद आसवानी उपस्थित होते.

डब्बू आसवानी यांनी सांगितले की, अ‍ॅड. अमर मूलचंदाणी हे 2009 पासून या बँकेचे चेअरमन आहेत. बँकेच्या संचालक मंडळाने मागील काळात केलेल्या बेकायदेशीर कर्ज वाटप आणि अनियमित व्यवहारांबाबत आम्ही वेळोवेळी मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री, मा. पालकमंत्री, सहकार आयुक्त तसेच संबंधित शासकीय संस्थांना निवेदन देऊन दखल घेणे विषयी विनंती केली होती. तसेच वेळोवेळी बँकेतील चुकीचे गैरव्यवहार उघडकीस आणण्यासाठी प्रयत्न केले होते. आमच्या तक्रारीची दखल घेऊन सहनिबंधक लेखापरीक्षण मा. राजेश जाधवर यांनी (दि 6/8/2019) या बँकेचा चाचणी लेखा परीक्षण अहवाल सादर केला. या लेखापरीक्षण अहवालात अनेक कर्ज खात्यांबाबत आक्षेप घेण्यात आला होता. यामध्ये 429 कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या कर्ज वितरणाबाबत विस्तृत नोंदी घेण्यात आल्या आहेत. हे कर्ज संशयितरित्या वाटप झाली असून ज्या व्यक्तीची आर्थिक क्षमता नाही अशा व्यक्तींना काही कोटी रुपयांचे कर्ज वितरण करण्यात आले आहे. परंतु त्या संबंधित व्यक्तीला त्यांच्या नावे कर्ज घेतले आहे हे देखील माहित नाही. त्यांच्यावर कर्ज वसुलीची नोटीस बजावण्यात आल्यानंतर या गोष्टी उघडकीस आल्या.

मा. राजेश जाधवर यांनी निपक्षपातीपणे हा चाचणी अहवाल तयार केल्यामुळेच अमर मूलचंदाणी आणि आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे गैरव्यवहार उघडकीस आले. या बँकेवर मागील वर्षी निर्बंध घालण्यात आले होते. प्रशासकाची नेमणूक करण्यात आली तरी देखील बँकेच्या कर्ज वसुलीत वाढ झाली नाही. परिणामी आरबीआयने बँकेचा परवाना रद्द केला आहे. या कारवाईमुळे पिंपरी चिंचवड शहरातील या बँकेच्या सभासद, ठेवीदार यांच्या आर्थिक हिताला बाधा पोचली आहे. हजारो सभासदांचे आर्थिक नुकसान यामुळे झाले आहे. विशेषता पिंपरी परिसरातील व्यापारी आणि सिंधी बांधवांवर याचा दूरगामी प्रतिकूल परिणाम होणार आहे असे डब्बू आसवानी यांनी सांगितले.

उद्योजक श्रीचंद आसवानी यांनी सांगितले की, या भ्रष्टाचारी संचालक मंडळाने काही कर्जदारांची दुचाकी घेण्याची आर्थिक क्षमता नसतानाही त्यांच्या नावे कोट्यावधी रुपयांची चार चाकी वाहने खरेदी करून ती कर्ज रक्कम अमर मूलचंदाणी यांनी स्वतः घेतली. बँकेतील रक्कम परस्पर वापरण्यास घेऊन त्यांनी शहरातील काही व्यापारी व उद्योजकांना बेकायदेशीर रित्या तीन टक्के मासिक व्याजाने या रकमा वितरित केल्या होत्या. याविषयी हिंजवडी पोलीस ठाणे येथे चौकशी सुरू होताच यातील काही व्यापाऱ्यांनी व उद्योजकांनी काही कोटी रुपये हिंजवडी पोलीस ठाण्यात जमा केले आहेत. अमर मूलचंदाणी हे कोणताही उद्योग, व्यवसाय करत नसल्याचे सकृत दर्शनी दिसते. तरी देखील त्यांच्याकडे कोट्यावधी रुपयांच्या आलिशान मोटारी कोठून आल्या. याविषयीची चौकशी केंद्र सरकारच्या ई. डी. व आय. टी. विभागाने करावी. तसेच अमर मूलचंदाणी आणि त्यांचे सहकारी संचालक मंडळ यांची चल, अचल, स्थावर, जंगम मालमत्ता जप्त करून आणि त्यांचे सर्व बँक खाते सील करून त्यांच्या सर्व संपत्तीची व बँकेतील खात्यांची चौकशी करण्यात यावी. अमर मूलचंदाणी आणि त्यांचे सहकारी संचालक यांच्या कडून आमच्या जीविताला धोका आहे याबाबत देखील आम्ही केंद्रीय गृहमंत्री यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे याची स्थानिक पोलीस प्रशासनाने देखील दखल घ्यावी अशी मागणी उद्योजक श्रीचंद आसवानी यांनी यावेळी केली आहे.

# ...ही गर्दी शिलवंत यांच्या कार्याची पोहोच पावती!

## माजी आमदार विलास लांडे : डॉ. अशोक शिलवंत यांचा स्मृतीदिन

**पिंपरी। । महाईन्यूज । प्रतिनिधी।**




**अशोक सर्वांगीण विकास सोसायटी व अशोक नागरी सहकारी बँकेचे संस्थापक डॉ. अशोक शिलवंत हे सम्राट अशोक यांच्या विचारांचे वारसदार म्हणून ओळखले जातात. संपूर्ण महाराष्ट्रात त्यांच्या कार्याचा ठसा आहे. त्यांच्या कार्याचा वारसा सक्षमपणे माजी नगरसेविका सुलक्षाण शिलवंत चालवत आहेत. त्यामुळे समाजाला कधीही शिलवंत साहेबांची उणीव भासणार नाही. आजच्या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने जमलेली गर्दी ही स्व. शिलवंत यांच्या प्रेमापोटी आणि सुलक्षणा यांच्या कार्याची पाहोच पावती आहे, असा विश्वास माजी आमदार विलास लांडे यांनी व्यक्त केला.**

अशोक सर्वांगीण विकास सोसायटी व अशोक नागरी सहकारी बँकेचे संस्थापक स्मृतीशेष डॉ. अशोक शिलवंत यांच्या द्वितीय स्मृतिदिनानिमित्त पुरस्कार वितरण कार्यक्रमात माजी आमदार लांडे बोलत होते.

यावेळी आचार्य रतनलाल सोनग्रा, माजी नगरसेविका सुलक्षणा शिलवंत-धर, अ‍ॅड. राजरत्न शिलवंत, शिलरत्न शिलवंत, कल्पना शिलवंत यांच्यासह राष्ट्रवादी पक्षाचे माजी शहराध्यक्ष संजोग वाघेरे, शहराध्यक्ष अजित गव्हाणे, वैशाली काळभोर, माजी उपमहापौर तुषार हिंगे, फजल शेख, माजी नगरसेवक बबनराव गाढवे, मुक्ताताई पडवळ,अमिना पानसरे, स्मिताताई कुलकर्णी, माई काटे, तुषार कामठे आदी उपस्थित होते.

यावेळी आचार्य रतनलाल सोनग्रा लिखित व डॉ. सुलक्षणा शिलवंत यांना समर्पित 'मुक्तजातक-बुद्धजातक' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच, नेत्र तपासणी, दंत चिकित्सा, हृदय तपासणी, बिपी-शुगर तपासणी, रक्ताची पातळी तपासणी आदी आरोग्य शिबिराचेही आयोजन करण्यात आले.

### पुरस्कारार्थींची नावे पुढीलप्रमाणे :

**डॉ. अशोक शिलवंत धम्मदीप पुरस्कार : ज्येष्ठ पत्रकार राही भिडे, समाजभूषण पुरस्कार : डॉ. बबन जोगदंड, आयु. शरद जाधव, साहित्यदीप पुरस्कार: कवयत्री जोत्स्ना चांदगुडे यांना प्रदान करण्यात आला.**

महाराष्ट्रात त्यांच्या कार्याचा ठसा आहे. त्यांच्या कार्याचा वारसा सक्षमपणे माजी नगरसेविका सुलक्षाण शिलवंत चालवत आहेत. त्यामुळे समाजाला कधीही शिलवंत साहेबांची उणीव भासणार नाही. आजच्या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने जमलेली गर्दी ही स्व. शिलवंत यांच्या प्रेमापोटी आणि सुलक्षणा यांच्या कार्याची पाहोच पावती आहे, असा विश्वास माजी आमदार विलास लांडे यांनी व्यक्त केला. अशोक सर्वांगीण विकास सोसायटी व अशोक नागरी सहकारी बँकेचे संस्थापक स्मृतीशेष डॉ. अशोक शिलवंत यांच्या द्वितीय स्मृतिदिनानिमित्त पुरस्कार वितरण कार्यक्रमात माजी आमदार लांडे बोलत होते.

## संपादकीय

# गोठवागोठवीचा हंगाम!

***महाराष्ट्रात २०१९ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीनंतर राज्यातील राजकारणाचा पार राग रंगच बदलून गेलेला आहे. भाजप आणि शिवसेना या स्वत:ला हिंदुत्ववादाचे संरक्षक म्हणवल्या जाणाऱ्या दोन पक्षांनी सत्तेसाठी असे काही डाव खेळले आणि एकमेकांना पेचात टाकले की राज्यात मोठा राजकीय पेचप्रसंग निर्माण झाला आहे.***

२०१९च्या विधानसभा निवडणुकीत युती होण्यापूर्वी केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपचे प्रमुख नेते अमित शहा यांनी आम्हाला अडीच वर्षे मुख्यमंत्रीपदाचे वचन दिले होते. इतकेच नव्हे तर आपण शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना शिवसैनिकाला मुख्यमंत्री बनवण्याचे वचन दिले होते. त्यामुळे शिवसेनेचा मुख्यमंत्री झालाच पाहिजे, अशी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची ठाम भूमिका होती, पण शिवसेनेपेक्षा आपल्या निवडून आलेल्या आमदारांची संख्या जास्त असल्यामुळे मुख्यमंत्री आमचाच होणार, असे भाजपचे म्हणणे होते.

आपण असे कुठले वचन दिलेच नव्हते, असे अमित शहा यांनी महाराष्ट्र दौऱ्यात सांगितले, पण उद्धव ठाकरे मात्र कायम सांगत राहिले की, भाजपने आम्हाला वचन देऊन त्याचा भंग केला. उपमुख्यमंत्री आणि भाजपचे नेते देवेंद्र फडणवीस यांनाही असेच वाटत राहिले की २०१४च्या विधानसभा निवडणुकीनंतर शिवसेना जशी आपल्या मागून आली, तशीच येईल आणि पाच वर्षे आपल्यासोबत राहील, पण त्यावेळी भाजपचा अपेक्षाभंग झाला. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचा मुख्यमंत्रीपदाचा अट्टाहास राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी अचूक हेरला आणि काँग्रेसला सोबत घेऊन महाविकास आघाडीची अनपेक्षित कल्पना अमलात आणली. मध्यंतरी देवेंद्र फडणवीस यांनी मराठीतील एका ज्येष्ठ अभिनेत्याशी बोलताना आपण शिवसेनेला अडीच वर्षे मुख्यमंत्रीपद द्यायला हवे होते, असे मान्य केले होते. त्यामुळे भाजपच्या गोटात आणि पोटात नेमके काय चालले आहे त्याचा पत्ता लागत नाही. कारण २०१४च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी भाजपने शिवसेनेशी असलेली युती तोडून निवडणूक लढली होती.

# सायबर क्राईम : अदृश्य चेहरे



भूमिका

**सायबर क्राईम ब्रँचच गुन्ह्यांचा तपास लावणे हे अतिशय जिकरीचे आणि चिकाटीचे काम असते आणि ते आपला सायबर विभाग कौशल्याने करतच असतो. पण 'माणूस आयुष्यातून उठू शकतो' इतकं गंभीर स्वरूप या गुन्ह्यांच आहे आणि म्हणूनच जनजागृती शिवाय याला पर्याय नाही...**

**सायबर क्राईमची कांही उदाहरणे.**

**(०१) कास्टिंग फ्रॉड :** या प्रकारात मोठ-मोठ्या प्रोडक्शन हाऊसेसच्या नावाने, 'तुमच्या मुलीला पिक्चर मध्ये काम देतो' म्हणून करारही केले जातात व त्यानंतर फोटोशूट, ड्रेसेसचा खर्च इत्यादी नावाखाली लाखोंनी रक्कम उकळली जाते. या सर्व गोष्टी ऑनलाईन होतात आणि आरोपी कधीही तुमच्या समोर येत नाही.

**(०२)के.वाय.सी.फ्रॉड :** यात SMS मध्ये लिंक येते. बँकेचे KYC अपडेट करायचे आहे म्हणून सांगितले जाते. लिंकवर क्लिक केल्यावर डुप्लिकेट वेबसाईट उघडली जाऊन तुमचे सर्व बँक डिटेल्स घेतले जातात व त्यानंतर तुमच्या खात्यातून पैसे गायब होतात. बँकांचे व्यवहार हे म्हणूनच अधिकृत वेबसाईटवर किंवा प्रत्यक्ष बँकेत जाऊन करणे हे आवश्यक.

**(०३)अॅमेझॉन फ्रॉड :'** तुम्हाला 'दिवाळी धमाका' 'न्यू इयर धमाका' या प्रकारच्या लॉटरीमध्ये "अॅमेझॉनवर" बक्षीस लागलय' असा फोन येतो, पत्रही पाठवले जाते. फुकट मिळणारी दहा लाखाची कार कोणाला नको असते ,मग त्यांनी दिलेल्या साईटवर आपण ऑनलाइन जातोच. आणि तिथेच फसतो.

**(०४)OLX फ्रॉड :** यात OLX वर ऑनलाइन आपण 'विकत घेत असलेली वस्तू' अथवा 'आपल्याला विकावयाची वस्तू' या दोन्ही बाबतीत गुन्हे घडू शकतात.

बहुतांशी वेळा तुम्हाला संपर्क करणारी व्यक्ती ही स्वतःला सैनिकी क्षेत्रातील असल्याचे दर्शवते, जेणेकरून ती फसवणार नाही याचा आपल्याला विश्वास वाटतो. तशी खोटी सैनिकी ओळख पत्रेही दिली जातात. आपण बँक डिटेल्स शेअर करुन पैसे भरतो, पण वस्तू येत नाही. 'काहीतरी गडबड झाली असावी' असं म्हणून दिलगिरी व्यक्त करून समोरचा आरोपी



QR कोड पाठवतो. आपण तो स्कॅन करतो आणि आपले अजूनच पैसे गायब होतात. वस्तू आपल्याला विकायची असेल तर समोरचा फोन करून ऑफर देतो. 'अकाउंट खात्रीसाठी मी आधी रू. १ पाठवतो' असं सांगून तो QR कोड पाठवतो. आपण स्कॅन करतो आणि खरंच रू. १ जमा झाल्यावर आपली खात्री पटून आपण त्याने पाठवलेला दुसरा कोडही स्कॅन करतो आणि आपल्या खात्यातले अजून पैसे गायब होतात. त्यामुळे अशा व्यवहारांमध्ये QR कोड वापरू नका आणि शक्यतोवर प्रत्यक्ष भेटून व्यवहार करा.

**(०५)न्यू इयर फ्रॉड :** वर्षअखेर जवळ येत चालली आहे. अशावेळी प्रसिद्ध उपहारगृहांच्या नावाने फेसबुकवर 'एका थाळीवर एक फ्री' अशाप्रकारच्या सवलतीच्या जाहिराती आपल्या पेजवर येत राहतात. त्या लिंकवर क्लिक केल्यावर तुम्हाला एका खोट्या फेसबुक पेजवर नेले जाते, तिथे फॉर्म भरून आपण आपले बँक डिटेल्स देतो. तुम्हाला 'तुमची थाळी तयार आहे, बँकेचा OTP शेअर करा' म्हणून मेसेज येतो. तुम्ही तो शेअर करता आणि..बुम! तुमच्या खात्यातले पैसे गायब! एका फ्री थाळीच्या नादात लोकांनी ५०-६० लाख रुपयेही गमावले आहेत.

**(०६)गुगल एडिट फ्रॉड :**यात बँकांचे, वाईन शॉपस्, पिझ्झा कंपन्यांचे 'कस्टमर केअर नंबर' एडिट करून (बदलून) त्यावरून तुम्हाला फोन केला जातो. त्यावरून तुमची वैयक्तिक माहिती, खात्याची माहिती घेतली जाते आणि बँकेचा ओटीपी मागवला जातो. वाईन किंवा पिझ्झाच्या खरेदीसाठी तुम्ही पैसेही भरता, पण डिलिव्हरी होत नाही. म्हणूनच कस्टमर केअर नंबर्स हे नेहमी अधिकृत साइटवर जाऊन पडताळून बघा आणि मगच व्यवहार करा.

**(०७)स्क्रीन शेअर फ्रॉड :** ज्यांना मोबाईल किंवा कम्प्युटर बाबत तांत्रिक ज्ञान नाही, विशेषतः वयस्कर व्यक्ती किंवा स्त्रिया, त्यांना यात फसवण्यात येते. 'तुम्हाला हवा तो व्यवहार करण्यास मी मदत करतो' असे सांगून तुमच्या कडून 'स्क्रीन शेअर' नावाचे अॅप डाऊनलोड करून तुमच्या कम्प्युटरचा अथवा मोबाईलचा ताबा समोरची व्यक्ती स्वतःकडे घेते. आणि त्यानंतर ती तुमच्या वैयक्तिक माहितीचा कसा आणि किती गैरवापर करू शकते, ते सांगू शकत नाही!

# शिवसेना नक्की कोणाची? एक अनुत्तरीत प्रश्न!

**शिवसेना कोणाची हा आजपर्यंत चर्चेचा विषय होता, शिवसेनेची स्थापना 19 जून 1966 ला हिंदुहृदयसम्राट श्री बाळासाहेब ठाकरे यांनी हिंदु तसेच महाराष्ट्र, मुंबई आणि मराठी भाषिक लोकांच्या हितासाठी केली.**



भाष्य

**-नीलेश डुटाळ**

(लेखक बँकिंग क्षेत्रात कार्यरत आहेत.)

त्यानंतर शिवसेनेने अनेक संकटांना सामोरे जावून संघर्ष केला. तसेच मुंबईला महाराष्ट्रापासून वेगळे करण्याचे अनेक प्रयत्न झाले. परंतु शिवसेनेच्या संघर्षामुळे आजपर्यंत ते शक्य झाले नाही. श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी संघटनेला शिवसेना हे नाव दिले. निवडणूक चिन्ह धनुष्यबाण निवडले. आजपर्यंत शिवसेनेच्या धनुष्यबाण या चिन्हावर लोकांनी मतदान केले. याच धनुष्यबाणासाठी आजपर्यंत श्री उद्धव ठाकरे व शिंदे साहेब यांच्यामध्ये रस्सीखेच चालू झाली. या रस्सीखेचमध्ये श्री बाळासाहेबांनी दिलेले नाव व चिन्ह धनुष्यबाण हे निवडणूक आयोगाने गोठविल्यामुळे आज ना ठाकरेंकडे आहे ना शिंदेकडे आहे. पुढच्यावेळी ज्यावेळी मतदान होईल त्यावेळी बाळासाहेबांचे विचार आणि त्यांनी निवडलेले धनुष्यबाण (ई.व्ही.एम.) मशिनला दिसणार नाही याची खंत जनतेला वाटल्याशिवाय राहणार नाही. आणि जे नाव व निवडणुक चिन्ह बाळासाहेबांनी निवडले व जनतेने ज्याच्यावर शिक्कामोर्तब केले. ते चिन्हच पुढे कधीच दिसणार नसेल तर आज विजय नक्की कोणाचा झाला याचा विचार करण्याची गरज वाटते.

शिवसेना नक्की कोणाची उद्धव ठाकरेंची की शिंदेची याची लढाई गेल्या 100 दिवसांपासून चालू आहे. लढाई कोटीपर्यंत गेली त्यानंतर निवडणूक आयोगाकडे गेली निवडणूक आयोगाने धनुष्यबाण या चिन्हालाच गोठविले. त्यावर बंदी घातली. खरे तर शिवसेनेची स्थापना व चिन्ह श्री बाळासाहेब ठाकरे यांनी ठरवले व जनतेने बाळासाहेब ठाकरेंना साथ दिली. परंतु बाळासाहेब ठाकरे आज जीवंत नाहीत. यामुळे शिवसेनेचा वारसदार कोण हे कोण ठरवणार? बाळासाहेब ठाकरे हयात नसतील परंतु त्यांना साथ देणारी जनता तर आहे ना? म्हणून या जनतेला शिवसेना कोणाची हे ठरवण्याची संधी मिळाली असती. तर जनतेने आज धनुष्यबाण कोणाच्या ना कोणाच्या हाती दिले असते. हे नसेल हे नक्की आणि मतदानाच्या वेळी धनुष्यबाण नक्की हरलेला असेल! दोघांच्या लढाईमध्ये तिसऱ्याचाच लाभ झालेले असेल. शिवसेनेचे धनुष्यबाण आणि महाविकास आघाडी सरकार पाडण्यामध्ये कुणाचा हात असेल, शिंदे गट शिवसेनेतून बाहेर पडण्याचे कारण ई.डी. आहे का, सरकारचा चुकीचा कारभार, का आमदार खासदारांनी एकत्र जमा केलेले काळे धन आहे हे सर्व जनतेला ठावूक आहे का जनता याची प्रचिती पुढच्या मतदाना वेळी देईल हे नक्की.

## ।। अभंगवाणी ।।



तीळ जाळिले तांदुळ ।
काम क्रोधे तैसे चि खळ ॥१॥
कां रे सिणलासी वाउगा ।
न भजतां पांडुरंगा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### ऋतुजा लटके शिंदे गटात जाणार?



।ठाणे। महाईन्यूज।

अंधेरी पूर्व पोटनिवडणुकीकडे संपूर्ण महाराष्ट्राचं लक्ष लागलं आहे. आमदार रमेश लटके यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी ऋतुजा लटके यांना अंधेरी पूर्व पोटनिवडणुकीसाठी महाविकास आघाडीकडून उमेदवारी देणं जवळपास निश्चित झालं आहे. यासाठी ठाकरे गटाकडून प्रचारालाही सुरुवात झाली आहे. अशी एकंदरीत स्थिती असताना ऋतुजा लटके यांना शिंदे गटात घेण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे प्रयत्नशील असल्याची चर्चा आहे. शिवाय ऋतुजा लटके यांनी स्वत: पाच दिवसांपूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. त्यामुळे ऋतुजा लटके शिंदे गटात सामील होणार का? याबाबत तर्क वितर्क लावले जात आहे.या यात्रेत बोलताना शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे यांनी महाप्रबोधन यात्रा काढण्यामागचे कारण स्पष्ट केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारने अनेक

# मुख्यमंत्र्यांचा कारभार फक्त एक वर्षाचा!

।नवी दिल्ली ।महाईन्यूज।

शिवसेनेतून बंडखोरी केल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी मविआ सरकारला धक्का दिला होता. ४० आमदार सोबत घेवून शिंदे गुहाटीला गेले होते. त्यानंतर त्यांनी राज्यातील महाविकास आघाडीचं सरकार पाडून भाजप सोबत जात नवं सरकार स्थापन केलं, आणि एकनाथ शिंदे राज्याचे नवे मुख्यमंत्री झाले. त्यामुळे उद्धव ठाकरे यांना देखील तो मोठा धक्का होता. त्यानंतर शिंदे सरकारने महाविकास आघाडीच्या काळात घेण्यात आलेले निर्णय रद्द करण्यात आले. त्यामुळे महाविकास आघाडी आणि शिंदे यांच्यात सारखी खडाजंगी पाहिला मिळते. बुधवारी राष्ट्रवादीचे प्रदेश अध्यक्ष जयंत पाटलांनी शिंदे सरकारवर टीका केली आहे. पाटील म्हणाले " बंडखोरांच्या मतदार संघात फिरून आल्यानंतर समजते की त्यांच्या विरोधात लोकांच्या मनात किती रोष आहे.

लोक त्यांना नक्कीच धडा शिकवतील त्यांचे डिपॉझिट जप्त होईल. महाविकास आघाडीने

## जयंत पाटलांचं सूचक विधान



लोकांच्या हितासाठी सगळे निर्णय घेतले. महाविकास आघाडीच्या कामांची दखल जागतिक पातळीवरही घेण्यात आली आहेत. शेतकरी कर्ज माफीचा निर्णय सगळ्यात आधी आम्ही घेतला. कोरोनाच्या काळात केलेल्या कामाचं देशभरात कौतुक झालं. पुढे पाटील म्हणाले "ज्याला मुख्यमंत्री व्हायचे होते त्याला उपमुख्यमंत्री केले आणि ज्याला उपमुख्यमंत्री व्हायचे होते त्याला मुख्यमंत्री केले. परंतु त्यांचा कारभार फक्त एका वर्षाचा आहे. शिंदे-फडणवीस सरकार आल्यापासून महाराष्ट्राला प्रत्येक गोष्टीत कमीपणा घ्यावा लागत आहे." असं मत जयंत पाटलांनी केलं.

# जालन्यात रावसाहेब दानवेंची लोकसभेची तयारी सुरू

**जालना** : शिवसेना-भाजप युती असताना जालना लोकसभेची जागा कायम भाजपकडेच राहात आलेली असून १९९६ पासूनच्या सात निवडणुका या पक्षाने सलग जिंकलेल्या आहेत. त्यापैकी १९९६ आणि १९९८ मध्ये उत्तमसिंह पवार भाजपकडून निवडून आले होते. तर १९९९ पासूनच्या सलग पाच निवडणुका रावसाहेब दानवे यांनी जिंकलेल्या आहेत. तसे पाहिले तर १९८९ पासून झालेल्या नऊ निवडणुकांत १९९१ मधील त्यावेळचे काँग्रेसमधील उमेदवार कै. अंकुशराव टोपे यांचा अपवाद वगळता आठ वेळेस भाजप उमेदवारांचा विजय जालना



लोकसभा मतदारसंघातून झालेला आहे. आगामी लोकसभा निवडणुकीतही रावसाहेब दानवे हेच उमेदवार असतील हे स्पष्टच असून त्यांनी स्वत:च जालना येथील रेल्वेच्या एका कार्यक्रमात यापूर्वी पुढील खासदार आपणच असू असे सांगून टाकलेले आहे. जालना आणि औरंगाबाद जिल्ह्यातील प्रत्येकी तीन विधानसभा मतदारसंघांचा समावेश असलेल्या या लोकसभा मतदारसंघावरील आपला प्रभाव दानवे यांनी यापूर्वी पाच वेळेस सिद्ध करून दाखविलेला आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या आघाडीत हा लोकसभा मतदारसंघ नेहमीच काँग्रेसकडे राहिलेला आहे. अपवाद फक्त १९९९ मधील निवडणुकीचा. कारण त्यावेळी काँग्रेस आणि राष्ट्रवादीमध्ये आघाडी झाली नव्हती आणि दोन्ही पक्षांनी स्वतंत्ररीत्या उमेदवार उभे केले होते. परंतु दानवे तीन लाख ३२ हजारांपेक्षा अधिक मते घेऊन निवडून आले. दोन वेळेस भोकरदनमधून विधानसभा सदस्य म्हणून निवडून येणाऱ्या दानवेंची ही पहिलीच लोकसभा निवडणूक होती आणि त्यांच्यासमोर काँग्रेस-राष्ट्रवादीचे स्वतंत्र उमेदवार होते. गेल्या नऊपैकी आठ निवडणुकांत आणि त्यापैकी सलग सात निवडणुकांत भाजपसमोर पराभूत झालेला काँग्रेस पक्ष आगामी निवडणुकीत भाजपला आव्हान देऊ शकेल का, हा खरा प्रश्न आहे.

# भक्ष्याच्या शोधात असलेला बिबट्या शिरला थेट स्वयंपाकघरात; सांगलीतील घटना

।सांगली। ।महाईन्यूज।

**भक्ष्य असलेल्या मांजराची शिकार करण्यासाठी पाठी लागलेला बिबट्या थेट स्वयंपाकघरात शिरण्याचा प्रकार वाळवा तालुययातील मरळनाथपूर येथे मंगळवारी रात्री घडला. जेवण करीत असलेल्या घरातील लोकांनी दार बंद करून वन विभागाला माहिती देताच, वन विभागाने मोठ्या हिंमतीने दार उघडून बिबट्याला नैसर्गिक अधिवासात सोडण्यासाठी प्रयत्न केले.**



याबाबत मिळालेली माहिती अशी, मरळनाथपूर गावातील पश्चिम दिशेला असलेल्या डोंगरालगत बाळासाहेब किसन हजारे यांची वस्ती आहे. काल रात्री घरातील सर्वजण स्वयंपाक घरात जेवण करीत असताना पाळीवर मांजर घरात आले. या मांजरापाठोपाठ बिबट्या घराच्याा पडवीतून स्वयंपाक घरात शिरला. जेवण तसेच सोडून सर्व जण बाहेरच्या पडवीत आले आणि स्वयंपाकघराचे दार कडी लावून बंद केले. तात्काळ ही माहिती वन विभागाला देण्यात आली. घटनेची माहिती वनविभागाला कळताच उपवनसंरक्षक निता कट्टे, सहाय्यक वनसंरक्षक डॉ अजित साजणे यांच्या मार्गदर्शनाखाली इस्लामपूरचे सुरेश चरापले, वनरक्षक रायना पाटोळे, अक्षय शिंदे, वनसेवक शहाजी पाटील, अनिल पाटील व प्राणी मित्र युनूस मनेर यांचे पथक घटनास्थळी पोहोचले. बिबटया वयाने लहान असल्याने त्याची आई जवळपासच रेंगाळत असल्याची शक्यता लक्षात घेउन बिबट्याला पिंजऱ्यात बंदिस्त न करता असलेल्या खोलीचा दरवाजा उघडून, त्याच्या जाण्याचा मार्ग मोकळा केला. दार उघडताच बिबट्या घरातून बाहेर पडून नैसर्गिक अधिवासात निघून गेला.

# "भाजपाने सावरकरांचं खेळणं केलं", शिवसेनेचा हल्लाबोल!

## "घरभेद्यांनीच सगळ्यात जास्त अपमान..."

।सांगली ।महाईन्यूज।

काँग्रेसची 'भारत जोडो यात्रा' कर्नाटकात पोहचली आहे. काँग्रेसचे नेते राहुल गांधींच्या नेतृत्वाखाली सुरु असलेल्या या यात्रेला नागरिकांचा मोठा पाठिंबा मिळत असल्याचं दिसत आहे. त्यातच एकाठिकाणी संबोधित करताना राहुल गांधींनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ( आरएसएस) आणि स्वांतत्र्यवीर सावरकरांना लक्ष केलं होते. यावरून राहुल गांधी आणि काँग्रेसवर भाजपाकडून टीका करण्यात येत होती. तसेच, शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे याचा निषेध करणार आहेत की नाही?, असा सवाल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विचारला होता. त्यावरून आता शिवसेनेने भाजपावर हल्ला केला आहे."राहुल गांधींनी काही वक्तव्य केले की, भाजपवाल्यांना सावरकरांचे स्मरण होते. तथाकथित माफी प्रकरणाचा रिकामा खुळखुळा



वाजवत बसण्यापेक्षा सावरकरांचे हिंदुत्व, हिंदू राष्ट्राचा विचार, हिंदुत्वाबाबतचा वैज्ञानिक दृष्टिकोन, सैनिकीकरणावरील भर यावर देशातील प्रत्येक विद्यापीठात 'अध्यासन' असायला हवे. सावरकरांच्या विचारांचे वारसदार असल्याचे सांगून जे सत्तेवर आले, त्यांनी तरी या दीपस्तंभाचा काय सन्मान केला? फक्त राहुल गांधींना दोष देऊन काय फायदा? घरभेद्यांनीच सावरकरांचा सगळ्यात जास्त अपमान केला," अशा शब्दांत शिवसेनेने सामना अग्रलेखातून भाजपाचा समाचार घेतला आहे."काँग्रेसने वीर सावरकरांचा खुळखुळा केला आहे, तर भारतीय जनता पक्षाने स्वातंत्र्यवीरांचे खेळणं केलं आहे.

काँग्रेस सावरकरांचा अपमान करीत असते व त्या अपमानाबद्दल भाजपवाले जाब वगैरे विचारत असतात. आताही महाराष्ट्राचे (उप) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वीर सावरकर यांच्या राहुल गांधीकृत अपमानावर संताप व्यक्त केला.

# सुप्रीम कोर्टाचा मोठा निर्णय; नोटबंदीच्या निर्णयाची होणार चौकशी

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।**





मोदी सरकारनं केलेल्या नोटबंदीबाबत सुप्रीम कोर्टानं बुधवारी एक मोठा निर्णय घेतला. त्यानुसार, हा मुद्दा केवळ अर्थव्यवस्थेसंदर्भातील मुद्दा होता की आणखी काही हे तपासण्यासाठी सरकारच्या नोटबंदीच्या निर्णयाची चौकशी होणं गरजेचं असल्याचं कोर्टानं म्हटलं आहे. पाच सदस्यांच्या खंडपीठाचे अध्यक्ष एस ए नझीर यांनी याबाबत म्हटलं की, यापूर्वी हा मुद्दा संविधानिक खंडपीठापुढं आला होता. त्यामुळं या खंडपीठाचं हे कर्तव्य आहे की, त्यावर उत्तर द्याव. कोर्टात युक्तीवादादरम्यान ॲटर्नी जनरल आर वेंकटरामानी यांनी म्हटलं की, नोटबंदीच्या कायद्याला जोपर्यंत योग्य परिप्रेक्ष्यातून आव्हान दिलं जात नाही तोपर्यंत या मुद्द्यावर चौकशी करता येणार नाही. डिनोमिनेशन बँक नोट कायदा अर्थात डिमोनिटायझेशन म्हणजेच नोटबंदी कायदा सन १९७८ मध्ये मंजूर करण्यात आला. मोठ्या रक्कमेच्या नोटा व्यवहारात अस्तित्वात राहिल्या तर त्याचे अर्थव्यवस्थेवर दूरगामी परिणाम होणार असतील तर जनहितासाठीच या कायद्याचा वापर करता येतो. सुप्रीम कोर्टानं म्हटलं की, सरकारनं घेतलेला नोटबंदीचा निर्णय अर्थव्यवस्थेसाठी यशस्वी ठरला की अपयशी ठरला यावर दोन्ही बाजू सहमत नाहीत त्यामुळं या प्रकरणाची तपासणी करणं आवश्यक आहे.

# केरळमध्ये जोडप्यांकडून दोन महिलांचा नरबळी

**केरळ :** दोन महिलांचा नरबळी दिल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. एर्नाकुलम जिल्ह्यात ही घटना समोर आली आहे. येथील एका जोडप्यानं झटपट श्रीमंत बनण्याच्या हव्यासापोटी महिलांचा नरबळी दिला आहे. त्यानंतर मृतदेहाचे तुकडेही या जोडप्यानं खाल्याचं पोलिसांनी सांगितलं आहे. या प्रकरणी जादूटोणा आणि नरबळी प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला असून



आरोपी जोडपे आणि त्यांच्या साथीदाराला अटक केली आहे.

भागवल सिंह आणि त्याची पत्नी लैला आणि रशीद उर्फ मोहम्मद शफी, असे अटक केलेल्या तीन आरोपींची नावं आहेत. तर, रोझलिन आणि पद्मा, असं नरबळी देण्यात आलेल्या दोन मृत महिलांची नावं आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत रोझलिन आणि पद्मा या दोन्ही महिला केरळच्या एर्नाकुलम जिल्ह्यातील वेगवेगळ्या भागांतील रहिवाशी होत्या. रोझलिन या जूनमध्ये तर पद्मा सप्टेंबरमध्ये बेपत्ता झाल्या होत्या. मृतांच्या

# तेल कंपन्यांना २२ हजार कोटींची भरपाई!

## केंद्रीय मंत्रिमंडळाचा निर्णय




**। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

देशातील तीन सार्वजनिक पेट्रोलियम कंपन्यांनी दोन वर्षांमध्ये (जून २०२० ते जून २०२२) आंतरराष्ट्रीय किमतीपेक्षा कमी दरांमध्ये गॅस सिलिंडरची विक्री केली. तीन कंपन्यांचे झालेले आर्थिक नुकसान भरून काढण्यासाठी एकरकमी २२ हजार कोटींचे अनुदान देण्याचा निर्णय बुधवारी केंद्रीय मंत्रिमंडळाने घेतल्याची माहिती केंद्रीय माहिती-प्रसारण मंत्री अनुराग ठाकूर यांनी पत्रकार परिषदेत दिली.


आंतरराष्ट्रीय स्तरावर 'एलपीजी'च्या किमती ३०० टक्क्यांपेक्षा जास्त वाढल्या असल्या तरी, देशांतर्गत स्तरावर घरगुती गॅस सिलिंडरचे दर केवळ ७२ टक्क्यांनी वाढवण्यात आले. सामान्यजनांवर वाढत्या दरांचा बोजा पडू नये, यासाठी इंडियन ऑइल कॉर्पोरेशन, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड आणि हिंदूस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड या तीनही सार्वजनिक पेट्रोलियन कंपन्यांनी कमी दरात गॅस सिलिंडरची विक्री केली. त्यामुळे या कंपन्यांना एकरकमी अनुदान देणे गरजेचे होते, असे ठाकूर यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. रेल्वे कर्मचाऱ्यांना ७८ दिवसांचा बोनस

मोदी सरकारने रेल्वे कर्मचाऱ्यांना दिवाळीची मोठी भेट दिली आहे.

# युक्रेनच्या अणुऊर्जा प्रकल्पाची वीज पुन्हा खंडित

## संयुक्त राष्ट्रांकडून चिंता व्यक्त

**। कीव्ह (युक्रेन) । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**



युरोपातील सर्वात मोठ्या झापोरीझिझया अणुऊर्जा प्रकल्पाचा बाह्य वीजपुरवठा पाच दिवसांत दुसऱ्यांदा खंडित झाला. या प्रकल्पाला रशियाच्या सैन्याने वेढा घातला असून प्रकल्पाच्या सुरक्षेबाबत संयुक्त राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थेने (आयएईए) चिंता व्यक्त केली आहे.

गेल्या आठवड्यात रशियाच्या क्षेपणास्त्र हल्ल्यामुळे प्रकल्पाचा वीजपुरवठा खंडित झाला होता. त्यानंतर डिझेल 'जनरेटर'च्या मदतीने सुरक्षा यंत्रणा सुरू ठेवण्यात आल्या होत्या. आता पुन्हा एकदा वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे या 'जनरेटर'ची मदत घेतली जात असून काही दिवस पुरेल एवढाच डिझेलसाठा शिल्लक असल्याचे सांगितले जात आहे. सुरक्षा यंत्रणांचा वीजपुरवठा खंडित झाला, तर मोठ्या किरणोत्सर्गाची भीती व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर आयएईएचे महासंचालक राफेल ग्रोसी यांनी इशारा दिला आहे. झापोरिझिझया प्रकल्पाच्या परिसराचे तातडीने निर्लष्करीकरण करण्यात यावे, अशी सूचना त्यांनी केली आहे.क्रिमिया पुलावर झालेल्या स्फोटप्रकरणी आठ जणांना अटक करण्यात आल्याची माहिती रशियाची अंतर्गत सुरक्षा संस्था, एफएसबीने दिली. यात रशियाचे पाच नागरिक असून तीन युक्रेन आणि अर्मेनियाचे असल्याचे सांगण्यात आले. युक्रेनच्या लष्करी गुप्तहेरांच्या सांगण्यावरून हा स्फोट करण्यात आल्याचा आरोप एफएसबीने केला आहे.

# आसाममधील पूरस्थिती गंभीर

## 40 हजार पूरग्रस्त; मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत

**। गुवाहाटी । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**



आसाममध्ये पडत असलेल्या संततधार पावसामुळे अनेक जिल्ह्यांना पुराचा फटका बसला आहे. सुमारे ४० हजार जण पूरग्रस्त असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. पूरग्रस्त जिल्ह्यांतील मदत-निवारा छावण्यांमध्ये अनेक पूरग्रस्तांनी आश्रय घेतला आहे. सोमवारपासून सुरू असलेल्या संततधारेमुळे गेल्या २४ तासांत चार जिल्ह्यांना पुराचा मोठा फटका बसला आहे. आठ महसूल मंडलांतील सुमारे ५० पेक्षा जास्त गाव-खेडय़ांचा यात समावेश आहे. धेमाजी, लखिपूर आणि दिब्रुगढ जिल्ह्यांतील जनजीवन संततधारेमुळे विस्कळीत झाले आहे. दिमा हसो जिल्ह्यात जितगा नदीला अचानक आलेल्या पुराचा अनेक भागांना फटका बसला आहे. जितगा नदीला अचानक आलेल्या पुरामुळे दगड वाहून नेणारा एक ट्रक अडकला. त्याचा वाहक आणि सहायकाने सुरक्षितस्थळी पलायन केल्याने त्यांना धोका उद्भवला नाही.

बोंगाईगाव, धेमाजी, दिब्रुगड, मोरीगाव आणि सोनितपूर जिल्ह्यांत जमिनीची मोठी धूप झाली आहे. जिल्हा प्रशासन आणि राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाची पथके पूरबाधितांना सुरक्षितस्थळी हलवत आहेत. केंद्रीय जल आयोगाने दिलेल्या माहितीनुसार ब्रह्मपुत्र नदी जोरहाटमधील नेमाती घाट येथे धोक्याच्या पातळीवरून वाहत आहे. प्रादेशिक हवामान केंद्राने वर्तवलेल्या अंदाजानुसार आसाम व मेघालयात बहुतांश ठिकाणी दिवसभरात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस कोसळणार आहे. गडगडाट,विजांच्या कडकडाटासह काही ठिकाणी वृष्टी होईल. गुरुवार ते शनिवारपर्यंत राज्यात अनेक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.

# ‘दृश्यम 2’ चित्रपटात तब्बू साकारणार भूमिका...




**बॉ**लिवूड अभिनेता अजय देवगणचा २०१४ मध्ये प्रदर्शित झालेला ‘दृश्यम’ चित्रपट चांगलाच हिट झाला होता. या चित्रपटाने प्रेक्षकांवर वेगळीच छाप पाडली होती. सस्पेन्स थ्रिलर असलेल्या या चित्रपटातील अजय देवगणचा अंदाज प्रेक्षकांना खूपच आवडला होता. लवकरच या चित्रपटाचा दुसरा भाग प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. अलिकडेच या चित्रपटाचा टीझर प्रदर्शित झाला होता. त्यानंतर आता या चित्रपटातील कलाकारांचे लूक समोर यायला सुरुवात झाली आहे. ‘दृश्यम २’ हा अजय देवगणच्या बहुप्रतिक्षित चित्रपटांपैकी एक आहे. ‘दृश्यम २’मध्ये काय होणार हे पाहण्यासाठी चाहते प्रचंड उत्सुक आहेत. सगळेजण या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत असतानाच आता या चित्रपटातील तब्बूचा फर्स्ट लूक पोस्टर प्रदर्शित झालं आहे. या पोस्टरमध्ये तब्बूच्या चेहऱ्यावरील हावभाव आक्रमक दिसत आहेत. ती दोन पोलिसांच्या मागे उभी आहे. यातून तब्बू या चित्रपटात तिच्या बेपत्ता मुलाचा शोध घेण्यासाठी अथक परिश्रम करणाऱ्या एका पोलिस अधिकाऱ्याच्या भूमिकेत दिसणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. तब्बूचे हे पोस्टर रिलीज झाल्यानंतर लगेचच या चित्रपटाच्या चाहत्यांनी त्यावर प्रतिक्रिया दिल्या आहेत. त्यासोबतच आता या चित्रपटाबद्दलची प्रेक्षकांची उत्सुकता आणखीन वाढली असल्याचेही त्यांनी सांगितले आहे. तब्बूचं हे पोस्टर सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. याआधी चित्रपटाचा टीझर प्रदर्शित झाला होता, त्यालाही प्रेक्षकांनी चांगली पसंती दर्शवली होती.

**अ**जय देवगणचा ‘दृश्यम’ चित्रपट २०१४ मध्ये प्रदर्शित झाला होता. या चित्रपटाचं दिग्दर्शन निशिकांत कामत यांनी केलं होतं. या चित्रपटात अजयसह श्रिया सरन, तब्बू, इशिता दत्ता यांच्या मुख्य भूमिका होत्या. कमी बजेटमध्ये तयार झालेल्या या चित्रपटाने ६७.१७ कोटी रुपयांचं कलेक्शन केलं होतं. आता याचा दुसरा भाग येत्या १८ नोव्हेंबरला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

# माझ्याकडे स्टारकिड...

**जु**लै महिन्यामध्ये हॉटस्टार या ओटीटी प्लॅटफॉर्मवर जान्हवी कपूरचा ‘गुड लक जेरी’ हा चित्रपट प्रदर्शित झाला. या चित्रपटामध्ये तिने जया कुमारी उर्फ जेरी ही भूमिका साकारली होती. तिच्या या भूमिकेला प्रेक्षकांची पसंती मिळाली. आनंद एल. राय यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले होते. ‘गुड लक जेरी’नंतर जान्हवी पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. तिच्या ‘मिली’ या आगामी चित्रपटासंबंधित नवी माहिती समोर आली आहे. या चित्रपटाचे टीझर आज सोशल मीडियावर पोस्ट करण्यात आला. जान्हवी एका फ्रीजिंग रुममध्ये अडकलेली असल्याचे या टीझरमध्ये पाहायला मिळते. ४८ सेकंदांच्या या टीझरमध्ये सनी कौशल आणि मनोज पाहवा हे कलाकार देखील दिसत आहेत. हा चित्रपट ४ नोव्हेंबर रोजी प्रदर्शित होणार आहे. तिने चित्रपटाचे पोस्टर तिच्या सोशल मीडिया हँडलवर पोस्ट केले आहे. दरम्यान एका मुलाखतीमध्ये जान्हवीने घराणेशाहीच्या मुद्द्यावरुन सुरु असलेल्या चर्चांवर भाष्य केले. गुडटाइम्सला दिलेल्या मुलाखतीदरम्यान ती म्हणाली, “लोक मला गृहीत धरतात. माझ्याकडे स्टारकिड असल्याने विशेषाधिकार आहेत असा त्यांचा समज झाला आहे. मी काम करताना मेहनत घेत नाही असे त्यांना वाटते. मी सर्वात प्रभावशाली किंवा सुंदर नसेन, पण मला सेटवरील सर्वात कष्टाळू व्यक्ती असल्याचा मला गर्व आहे. कोणीही माझ्या कामाप्रती असलेल्या निष्ठेवर शंका घेऊ शकत नाही.”





# अक्षय कुमारच्या ‘राम सेतू’ चित्रपटाच्या जबरदस्त ट्रेलर

**अ**भिनेता अक्षय कुमार आणि जॅकलीन फर्नांडिस, नुसरत भरुचा यांचा आगामी राम सेतु चित्रपट सध्या चर्चेत आहे. नुकताच या चित्रपटाचा जबरदस्त ट्रेलर प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटामध्ये अक्षय कुमाराने एका आर्कियोलॉजिस्टची भूमिका साकारली आहे. जो आपल्या टीमसोबत राम सेतुच्या अस्तित्वाला वाचवण्यासाठी 7 हजार वर्ष जुन्या इतिहासाचा पडदा हटवताना दिसून येईल. या ट्रेलरमध्ये अक्षयच्या जबरदस्त अभिनयासोबतच धमाकेदार स्टंट सुद्धा पाहायला मिळत आहे. ‘राम सेतु’चा ट्रेलर प्रेक्षकांच्या पसंतीस उतरत आहे. ट्वीटर अक्षय कुमारच्या या आगामी चित्रपटाला जबरदस्त प्रतिक्रिया देत आहेत. एका युजरने ‘राम सेतु’च्या ट्रेलरवर प्रतिक्रिया देत लिहिलंय की, ट्रेलर चांगला आहे. अक्षय कुमार आपल्या चित्रपटाच्या माध्यमातून प्रेक्षकांना चित्त थरारक अनुभव देणार आहे. मात्र, पिक्चर अजून बाकी आहे. तर दुसऱ्या युजरने लिहिलंय की, खूप छान ट्रेलर, जर स्क्रीनप्लेने काम केलं तर बॉलिवूडला दिवाळीमध्ये एक ब्लॉकबस्टर चित्रपट पाहायला मिळणार आहे. अभिषेक शर्मा यांच्या दिग्दर्शनात तयार झालेला अक्षय कुमारचा ‘राम सेतु’ चित्रपट 25 ऑक्टोबर रोजी प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाबाबत चाहत्यांमध्ये खूप उत्सुकता आहे.

# जान्हवी कपूर दिसणार वेगळ्या भूमिकेत

**स**ध्या बॉलिवूडमध्ये अनेक मोठ्या चित्रपटांच्या चर्चा आहेत. एकीकडे अनेक चित्रपटांची चित्रीकरणं सुरू आहेत, तर दुसरीकडे अनेक चित्रपट प्रदर्शनासाठी सज्ज आहेत. आता या सगळ्यामध्ये जान्हवी कपूरचा ‘मिली’ चित्रपट जबरदस्त चर्चेत आला आहे. या चित्रपटाचा उत्कंठावर्धक टीझर आज प्रदर्शित झाला आहे. हा टीझर पाहून तिचे चाहते या चित्रपटासाठी फार उत्सुक झालेले दिसत आहेत. सत्य घटनेवर आधारित जान्हवी कपूरच्या ‘मिली’ चित्रपटाचा टीझर ४८ सेकंदांचा आहे. या चित्रपटात जान्हवी ‘मिली नौटियाल’ या नर्सिंग ग्रॅज्युएटची भूमिका साकारत आहे. या टीझरमध्ये जान्हवी एका फ्रीजिंग रूममध्ये अडकलेली दिसत आहे. ती या खोलीतून बाहेर पडण्याचा ती अतोनात प्रयत्न करत आहे पण तिला ते सहज शक्य होत




# समित कक्कडच्या ‘36 गुण’ चित्रपटाचा धमाकेदार ट्रेलर प्रदर्शित

**ल**ग्नाच्या गाठी स्वर्गात बांधल्या जातात असे आपल्याकडे म्हणतात. ग्रह-तारे, पत्रिका, एका भेटीतच साताजन्माच्या गाठी बांधणे वगैरे या सगळयाच्या पलीकडे जाऊन नव्या नात्याची सुरुवात करीत असताना कुंडलीपेक्षा एकमेकांची मतं जुळणं महत्त्वाचं असतं हा विचार मांडणारा समित कक्कड दिग्दर्शित ‘३६ गुण’ मराठी चित्रपट ४ नोव्हेंबरला प्रेक्षकांच्या भेटीला येतोय. तत्पूर्वी या चित्रपटाचा ट्रेलर लॉंच सोहळा नुकताच संपन्न झाला. संतोष जुवेकर आणि पूर्वा पवार यांची मुख्य भूमिका असलेल्या या चित्रपटात पुष्कर श्रोत्री, विजय पाटकर, वैभव राज गुप्ता, स्वाती बोवलेकर हे कलाकार आहेत.

बोल्ड पण विचार करायला लावणाऱ्या धमाकेदार ट्रेलरमधून आजची पिढी लग्नव्यवस्थेतील किचकट, मानसिक ताणतणावाची प्रक्रिया बदलू पाहते आहे याची झलक पहायला मिळते. नाती आशा-अपेक्षांच्या व्यापारात गोवली जाऊ नयेत. लग्न करणाऱ्या दोघांनीही एकमेकांना समजून घेऊन, प्रत्येक बाबतीत एकमेकांना साथ देणे अतिशय गरजेचे आहे हे प्रभावीपणे मांडण्याचा प्रयत्न ‘३६ गुण’ चित्रपटातून करण्यात आला आहे

‘द प्रॉडक्शन हेडक्वार्टर्स लि’ व ‘समित कक्कड फिल्म्स निर्मित ‘३६ गुण’ चित्रपटाची निर्मिती मोहन नाडार, समित कक्कड, संतोष जुवेकर आणि सावित्री विनोद गायकवाड यांनी केली असून निखिल रायबोले, भूपेंद्रकुमार नंदन यांच्या कॅफे मराठीने या चित्रपटाची प्रस्तुती केली आहे. चित्रपटाची कथा, पटकथा समित कक्कड आणि हृषिकेश कोळी यांची आहे. संवाद हृषिकेश कोळी यांचे आहेत. छायाचित्रण प्रसाद भेंडे तर संकलन आशिष म्हात्रे, अपूर्वा मोतीवाले-सहाय यांचे आहे. मंगेश कांगणे यांच्या गीतांना अजित परब यांचे संगीत लाभले आहे. ४



## शॉर्ट न्यूज »

### अमेरिकेकडून भारताचा पराभव

**।भुवनेश्वर। महाईन्यूज**

यजमान भारताला मंगळवारी कुमारी (१७ वर्षांखालील) विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या सलामीच्या सामन्यात बलाढ्य अमेरिकेच्या संघाकडून ०-८ असा मोठा पराभव पत्करावा लागला. कोणत्याही वयोगटातील महिला विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाचे हे पदार्पण होते. मात्र, अमेरिकेच्या आक्रमक खेळापुढे भारतीय संघाचा निभाव लागला नाही. अमेरिकेच्या संघाने तब्बल ७९ टक्के वेळ चेंडूवर ताबा मिळवला. तसेच त्यांनी गोलच्या दिशेने ३० फटके मारले, याउलट भारतीय संघ केवळ दोनच फटके अमेरिकेच्या गोलच्या दिशेने मारू शकला. मेलिना रेबिम्बास (९ आणि ३१व्या मिनिटाला), शार्लोट कोहलेर (१५व्या मि.), ओन्येका गमेरो (२३व्या मि.) आणि जिसेल थॉम्पसन (३९व्या मि.) यांनी केलेल्या गोलच्या जोरावर अमेरिकेने मध्यंतरालाच ५-० अशी आघाडी घेतली. उत्तरार्धात एला एमरी (५१व्या मि.), टेलर सुआरेझ (५९व्या मि.) आणि भारतीय वंशाच्या मिया भुटाने (६२व्या मि.) गोल करत अमेरिकेला सामना जिंकवून दिला.

# राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा : निखिलचे सुवर्णयश

## राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत बॉक्सिंगमध्ये सुवर्णपदक मिळाले

**अहमदाबाद । महाईन्यूज । वृत्तसंस्था**

बॉक्सिंग स्पर्धेतील सुवर्णपदकाने महाराष्ट्राने आपल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेची सांगता केली. महाराष्ट्राला १९९४ नंतर प्रथमच राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत बॉक्सिंगमध्ये सुवर्णपदक मिळाले. प्रशिक्षकांच्या निधनाचे दु:ख विसरून निखिल दुबेने ७५ किलो वजन गटात हे सुवर्णयश मिळविले. निखिलची उपांत्य लढत पाहण्यासाठी त्याचे प्रशिक्षक धनंजय तिवारी मोटारसायकलने मुंबईहून गुजरातला निघाले होते. मात्र, वाटेत त्यांचे अपघाती निधन झाले. त्यांच्या अपघाताचे वृत्त निखिलला उपांत्य लढतीपूर्वीच कळले होते. मात्र, निखिलने दु:ख विसरून उपांत्य लढत जिंकली आणि त्यानंतर बुधवारी अंतिम फेरीतही मिझोरामच्या मलसाव मितलुंगचा धुव्वा उडवून ऐतिहासिक



सुवर्णपदक मिळवले. निखिलच्या आक्रमक खेळापुढे मलसाव निष्प्रभ ठरला. त्यामुळे पंचांनी निखिलच्या बाजूने ५-० असा कौल दिला.

करोनाकाळात निखिलच्या वडिलांचे निधन झाले होते. त्यानंतरही त्याने खेळावर लक्ष केंद्रित करून सराव सुरू ठेवला. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत वडील आणि प्रशिक्षक यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी निखिल लढला आणि जिंकला. निखिलने आपले सुवर्णपदक गुरू आणि वडिलांनाच समर्पित केले. बॉक्सिंग खेळातच कारकीर्द करण्याचा निश्चय व्यक्त करत निखिलने आशियाई क्रीडा स्पर्धेचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवले आहे.

> प्रशिक्षकांच्या निधनाचे दु:ख विसरून निखिल दुबेने ७५ किलो वजन गटात हे सुवर्णयश मिळविले. निखिलची उपांत्य लढत पाहण्यासाठी त्याचे प्रशिक्षक धनंजय तिवारी मोटारसायकलने मुंबईहून गुजरातला निघाले होते. मात्र, वाटेत त्यांचे अपघाती निधन झाले. त्यांच्या अपघाताचे वृत्त निखिलला उपांत्य लढतीपूर्वीच कळले होते. मात्र, निखिलने दु:ख विसरून उपांत्य लढत जिंकली आणि त्यानंतर बुधवारी अंतिम फेरीतही मिझोरामच्या मलसाव मितलुंगचा धुव्वा उडवून ऐतिहासिक सुवर्णपदक मिळवले. निखिलच्या आक्रमक खेळापुढे मलसाव निष्प्रभ ठरला. त्यामुळे पंचांनी निखिलच्या बाजूने ५-० असा कौल दिला.

# आशिया चषक क्रिकेट स्पर्धा : वर्चस्व राखण्यासाठी भारतीय महिला संघ सज्ज!

## आज उपांत्य फेरीत थायलंडशी सामना



**सिल्हेट । महाईन्यूज । वृत्तसंस्था**

भारतीय महिला संघाने आशिया चषक ट्वेन्टी-२० क्रिकेट स्पर्धेत सातत्यपूर्ण कामगिरी केली असून गुरुवारी थायलंडविरुद्धच्या उपांत्य फेरीतील सामन्यातही निर्विवाद वर्चस्व राखण्याचा त्यांचा प्रयत्न असेल. भारतीय संघाने या स्पर्धेच्या सहापैकी पाच सामन्यांत विजय मिळवले, तर केवळ पाकिस्तानविरुद्ध त्यांना पराभव पत्करावा लागला. थायलंडविरुद्धच्या सामन्यातही भारताचे पारडे जड मानले जाते आहे.

भारताने साखळी सामन्यात थायलंडला अवघ्या ३७ धावांत गुंडाळले होते. त्यानंतरही थायलंडने गतविजेत्या बांगलादेशला मागे टाकून उपांत्य फेरीत प्रवेश मिळवला. या स्पर्धेसाठी पात्र ठरून उपांत्य फेरी गाठल्यानंतर आता आगेकूच सुरू ठेवण्यासाठी थायलंडचा संघ उत्सुक आहे. त्याच वेळी पुढील वर्षी होणाऱ्या ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेपूर्वी दुसऱ्या फळीतील खेळाडूंची क्षमता तपासून पाहण्याची भारतासमोर यापेक्षा दुसरी योग्य वेळ नाही. भारताची कर्णधार हरमनप्रीत कौर या स्पर्धेच्या सहापैकी केवळ तीन सामन्यांत खेळली आहे. मात्र, तिच्या अनुपस्थितीतही भारताचे चांगली कामगिरी सुरू ठेवली. आतापर्यंत भारतीय व्यवस्थापनाने किरण नवगिरे, दयालन हेमलता अशा पर्यायांचा विचार केला. मात्र, या दोघींना प्रभाव पाडता आला नाही. त्यामुळे उपांत्य फेरीत भारतीय संघ पुन्हा युवकांना अधिक संधी देणार की अंतिम सामन्याच्या दृष्टीने आपल्या आघाडीच्या खेळाडूंवर अवलंबून राहणार हे पाहणे महत्वाचे ठरेल. भारताच्या फलंदाजीची भिस्त स्मृती मानधना, जेमिमा रॉड्रिग्ज आणि शफाली वर्मावर असेल. दीप्ती शर्माने अष्टपैलू कामगिरी करताना भारताच्या यशात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही